<u>नि.दि.मु.क्र.४१/२०१७ मधील निशाणी ६७ वरील आदेश</u>

**(विलास पार्सेकर वि.रुक्मिणी पार्सेकर वगैरे )**

**सीएनआर क्र. एमएचएसआय–०५–०००१८१२०१७**

१. प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहितेचे आदेश ६ नियम १७ प्रमाणे प्रतिवादी क्र.२ यांचे वारस अभिलेखावर घेवून दाव्यात दुरुस्ती करणेस परवानगी मिळणेकरीता दाखल केलेला आहे.

२. प्रस्तुत अर्जाचे कामी वादी यांचे कथन असे आहे की, प्रतिवादी क्र.२ गोविंद सखाराम पार्सेकर हे दि.११/१०/२०२० रोजी मयत झालेले आहेत. प्रस्तुतकामी प्रतिवादी क्र. २ यांचे वारस परशुराम यांनी निशाणी ६३ कडे दिलेल्या अर्जातील नमूद वारसांव्यतिरिक्त अन्य कुणीही कायदेशीर वारस नाहीत. सबब, प्रतिवादी क्र.२ यांचे वारस अभिलेखावर घेण्यात यावेत व त्याअनुषंगाने दाव्यामध्ये दुरुस्ती करण्यास परवानगी मिळावी अशी वादी यांनी विनंती केली आहे.

३. प्रस्तुत अर्जावर प्रतिवादी क्र.२ग यांनी म्हणणे दाखल करुन असे कथन केले आहे की, प्रस्तुतचा अर्ज सद्भावनेचा नसून तो त्यांना मान्य व कबूल नाही. वादी यांनी केवळ दाव्यास विलंब व्हावा या उद्देशाने प्रतिवादी क्र. २ यांचे वारस पटलावर आणण्यासाठी जाणीवपुर्वक टाळाटाळ केलेली आहे. प्रतिवादी क्र. २ मयत झाल्याचे प्रतिवादीतर्फे न्यायालयास कळविण्यात आलेले होते. प्रतिवादी क्र. २ हा मयत झाल्याची पुर्ण जाणीव वादीस होती. केवळ प्रतिवादी क्र. २ यांच्या वारसांची कटकट नको म्हणून प्रतिवादी क्र. २ विरुध्द वादी यांनी दावा अवसान पावल्याचा आदेश करुन घेतला. मात्र ही लबाडी प्रतिवादी क्र. २ च्या वारसांच्या लक्षात येताच प्रतिवादी क्र. २ यांच्या वारसांनी दिवाणी कार्यप्रणाली संहितेच्या हुकूम १, नियम १० प्रमाणे निशाणी ५९ च्या अर्जावरुन प्रतिवादी क्र. २ यांचे कायदेशीर वारस वादी यांच्या निदर्शनास आणून दिले. प्रतिवादी यांना त्रास देण्यासाठी वादी यांनी प्रतिवादी क्र. २ यांचे वारस बऱ्याच कालावधीनंतर दाखल केलेले आहेत. त्यामुळे वादी यांचा अर्ज मंजूर करावयाचा झाल्यास वादीवर जास्तीत जास्त खर्च आकारण्यात यावा अशी प्रतिवादी क्र.२ग यांनी विनंती केली आहे. तसेच प्रतिवादी क्र. ३, ६ व ७ यांनी त्यांचे म्हणणे दाखल केले नसल्यामुळे प्रस्तुतचा अर्ज त्यांच्या म्हणणेविना चालविण्यात येतो असा आदेश पारीत करण्यात आला. इतर प्रतिवादी यांनी त्यांचे म्हणणे दाखल केलेले नाही.

**४.** प्रस्तुतकामी उभयपक्षकारांच्या विधीज्ञांचे युक्तिवाद ऐकले. प्रस्तुत अर्जाचा अभिलेखावरील कागदपत्रांचा व विधीज्ञांचे युक्तिवादाचा विचार करता असे दिसून येते की, प्रतिवादी क्र.२ गोविंद सखाराम पार्सेकर हे दि.११/१०/२०२० रोजी मयत झालेले आहेत. प्रतिवादी क्र.२ यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या कायदेशीर प्रतिनिधींविरुध्द दावा पुढे चालविण्याचा वादीचा अधिकार टिकून राहत असल्यामुळे वादी यांचा निशाणी ६५ कडील अर्ज हा मंजूर करण्यात आला आहे. त्यामुळे सदर अर्जाच्या अनुषंगाने दाव्यामध्ये दुरुस्ती करणे आवश्यक आहे. तसेच प्रस्तुत प्रतिवादी क्र.२ यांचे वारस रेकॉर्डवर घेतल्यास दाव्याचा गुणदोषावर निर्णय होण्यास मदत होणार असून वादी व प्रतिवादी यांच्यातील वादाचे कायमस्वरुपी निराकरण होणार आहे. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. सबब, मी पुढीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. वादी यांचा नि.६७ कडील अर्ज मंजूर करणेत येतो.

२. वादी यांनी निशाणी ६५ कडील खर्चाची रक्कम भरुन १४ दिवसांच्या आत प्रतिवादी क्र.२ यांचे वारस अभिलेखावर घ्यावयाचे आहेत व त्याप्रमाणे दाव्यात दुरुस्ती करून त्याच दिवशी दाव्याची दुरूस्त प्रत अभिलेखावर दाखल करावी.

(सदरचा आदेश खुल्या न्यायालयात घोषीत केला.)

SOURABH JAYKUMAR CHIVATE
Digitally signed by SOURABH JAYKUMAR CHIVATE
Date: 2025.11.25 11:52:15 +0530

दि. १९/११/२०२५ (एस.जे.चिवटे)

वेंगुर्ला दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर वेंगुर्ला